# प्रेसनोट दि. १२/०५/२०१८

## लोहगाव येथील लॉजवर छापा
## ४ सज्ञान मुलींची सुटका
## लॉज चालक अटकेत

दि.११/०५/२०१८ रोजी सामाजिक सुरक्षा विभाग, गुन्हे शाखेकडील पोलीस निरीक्षक श्री.संजय पाटील, -यांना पोलीस नाईक सचिन कदम यांचे कडुन माहीती मिळाली की, हॉटेल तोरणा लॉज, पोरवाल रोड, लोहगाव पुणे येथे इसम नामे दिपक हा त्याचे अन्य साथीदारांसह हॉटेल तोरणाचे मागील बाजुस असलेल्या तोरणा लॉजींग, पोरवाल रोड,लोहगाव पुणे येथे बाहेरील राज्यातील व महाराष्ट्रातील मुलींना ठेवुन तेथे वेश्या व्यवसाय करुन घेत अशी खात्रीशीर माहिती मिळाली, त्यावरुन अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंधक कक्ष गुन्हे शाखा पुणे शहरचे पोलीस निरीक्षक श्री. संजय पाटील व सामाजिक सुरक्षा विभागाकडील अधिकारी, कर्मचारी तसेच विमानतळ पोलीस स्टेशनकडील पोलीस निरीक्षक श्री. विलास सोंडे यांनी संयुक्त कारवाई करून लोहगाव परिसरातील तोरणा लॉजमध्ये चालत असलेल्या वेश्याव्यवसाया बाबत खातरजमा करुन तेथे छापा टाकला. छाप्या दरम्यान पश्चिम बंगाल राज्यातील २ मुली व महाराष्ट्रतील २ मुली अशा एकुण ४ सज्ञान मुलींची वेश्याव्यवसायातुन सुटका करुन त्यांना वेश्या व्यवसायास लावणारे १) दिपक ऊर्फ दिपेंद्र गोविंदी प्रसाद वय २७ वर्षे ग्राम फरदुवा तालुका लहार जि भिंड मध्यप्रदेश राज्य, २) दगडु सुदाम खांदवे रा. हरणतळे वस्ती लोहगाव पुणे, - लॉज मालक ३) मनोज प्रभुदयाल दोहरे वय २९ रा. जगदीशपुरा रुर जगदिशपुरा भिंड मध्यप्रदेश राज्य,-- लॉज मॅनेजर ४) भिमराव महेंद्र दोहरे वय २० वर्षे रा गंगेपुरा भिंड लहार मध्यप्रदेश,-- सहाय्यक यांचेविरुध्द विमानतळ पो.स्टे. १४९/२०१८ अनैतिक मानवी व्यापार प्रतिबंध अधिनियम. १९५६ कलम ३,४,५ सह भा.दं.वि.क. ३७०, ३७० अ,३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपी क्रमांक ३ व ४ यांना कारवाईचे वेळी ताब्यात घेण्यात आले आहे.

कारवाईचेवेळी रोख ३५,०००/- रुपये, ७ मोबाईल फोन, लॉजचे रजिस्टर, हिशोबाच्या डाय-या व इतर कागदपत्रे असा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे. तसेच या गुन्ह्यातील पिडीत मुलींना रेस्क्यु होम, महमंदवाडी, हडपसर येथे संरक्षणकामी ठेवण्यात आले आहे.

वरील नमुद कारवाई ही मा.श्री.प्रदिप देशपांडे, अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, मा.श्री.पंकज डहाणे, पोलीस उप आयुक्त, गुन्हे पुणे, मा.श्री.भानुप्रताप बर्गे, सपोआ, गुन्हे-२, यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.संजय पाटील, सपोनि चंद्रकांत जाधव, सचिन कदम, राजाराम घोगरे, नामदेव शेलार, तुषार आल्हाट, प्रदिप शेलार, नितिन तेलंगे, संदीप गायकवाड,रेवनसिध्द नरोटे, सुनिल नाईक, गीतांजली जाधव, अनुराधा ठोंबरे, सुप्रिया शेवाळे यांनी व विमानतळ पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक (गुन्हे) विलास सोंडे व त्यांचे स्टाफसह सयुंक्तीक कारवाई केली आहे.